15 APR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऐतिहासिक दाखले तृतीयपंथीयांपर्यंत पोहोचले नाहीत

## ‘मैत्री’च्या मयूर आळवेकर, शिवानी गजबर यांची खंत, कुलगुरुंसमोर मांडल्या व्यथा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तृतीयपंथी समाजाला भेडसावणारे दैनंदिन प्रश्न, त्यांच्या व्यथा या शासन व विविध स्तरावर मांडताना मैत्री संघटनेला खूप अडचणींना सामोरे जावे लागते. यातील प्रमुख अडचण कागदपत्रांची असते. अनेक ऐतिहासिक दाखले व पुरावे हे देवदासी, वाघ्या-मुरळी, तृतीयपंथी समाजातील अन्य घटक त्यांच्याबाबतीत उपलब्ध आहेत; पण ते अजूनही या समाजापर्यंत पोहोचलेले नाहीत, अशी व्यथा ‘मैत्री’ संघटनेच्या अध्यक्ष मयूर आळवेकर, शिवानी गजबर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमोर मांडल्या.

छत्रपती शिवाजी विद्यापीठ येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या शिवानी गजबर या तृतीयपंथी मुलीचा विद्यापीठातर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आला. यावेळी तिचे कुलगुरू शिर्के यांच्यातर्फे अभिनंदन करण्यात आले व पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यानंतर आळवेकर, गजबर यांनी कुलगुरुंशी चर्चा केली. या चर्चेत शिवानी हिच्या विद्यापीठातील



प्रवेशावेळी आलेल्या अडचणी, तृतीयपंथी समाजाला भेडसावणारे दैनंदिन प्रश्न, त्यांच्या व्यथा या शासन व विविध स्तरावर मांडल्या. यातील प्रमुख अडचण कागदपत्रांची असते. जी ऐतिहासिकदृष्ट्या समाजातील लैंगिक अल्पसंख्याक घटकांबाबतीत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. वेळोवेळी अनेक स्तरावर पाठपुरावा करताना कागदपत्रांच्या अभावामुळे प्रसंगी संघटनेला समाजासाठी झटताना माघार घ्यावी लागते. याबाबतचे सर्व शोधनिबंध किंवा हे दाखले त्या अभ्यासापुरते आणि विद्यापीठापुरते मर्यादित राहिलेले आहेत. यामुळे या समाजाला त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढताना नक्कीच ही सर्व कागदपत्रे उपयुक्त ठरतील. या दृष्टिकोनातून मैत्री संघटनेने निवेदन देऊन चर्चा केली. या समाजाविषयी कोणतीही कागदपत्रे विद्यापीठाकडे उपलब्ध असतील, तर ती संघटनेसोबत शेअर करून संघटनेस पाठबळ द्यावे, असे आवाहनही केले आहे.

**सर्वतोपरी सहकार्य : कुलगुरू –** शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशकता या विभागाच्या माध्यमातून संघटनेस सर्वतोपरी सहकार्य हवे असल्यास नक्कीच करण्यात येईल. शिक्षण अर्ध्यात सोडलेल्या किंवा ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले असून, त्यांना पुढे शिकण्याची इच्छा असणाऱ्या तृतीयपंथांनी शिकण्यासाठी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील विविध कोर्सेसमध्ये शिक्षण पूर्ण करावे, असे कुलगुरू शिर्के यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि कास्ट्राईब संघटना कार्यालयाचा प्रथम वर्धापन दिन शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रारंभी प्रतिमा पूजन करण्यात आले. मराठी विज्ञान परिषदेचा सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल उपकुलसचिव डॉ. यू. के. सकट आणि इतर पुरस्कार प्राप्त कर्मचारी, अधिकारी, विद्यार्थी, पेटंट प्राप्त संशोधकांचा प्रमुख उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष आनंदराव खामकर, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, एन. बी. गायकवाड, सरदार सोनंदकर, दिनेश उथळे, उदय पवार, संतोष वंगार, दीपक शिंदे, मिलिंद सुरलकर, सुनीता वांगीकर, जयश्री माने आदी उपस्थित होते. कास्ट्राईब संघटना आणि वैभवलक्ष्मी ब्लड बँकेतर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले. दरम्यान, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शिवलिंगप्पा सपली आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2024

पुण्यनगरी

**शिवाजी विद्यापीठ :** शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2024
पुढारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2024

लोकमत

**शिवाजी विद्यापीठ**

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 APR 2024
पुण्यनगरी

# आयुष्यभर विद्यार्थीपण जपावे : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आजन्म विद्यार्थी असावे, नेहमी अलौकिक कार्य करण्याची संधी शोधावी. स्वतःचे तत्त्वज्ञान निर्माण करावे, तसेच श्रम आणि नैतिकता ही चिरंतन टिकणारी मूल्ये असून, विद्यार्थ्यांनी यावर विश्वास ठेवून कार्य करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. न्यू कॉलेज कोल्हापूर येथे न्यू कॉलेज मेरिट स्कॉलरशिप वितरण समारंभ श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेच्या सभागृहात झाला, यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे संचालक विनय पाटील म्हणाले, आयुष्यात कठोर परिश्रमाशिवाय यश संपादन करता येत नाही. कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील, संचालक डॉ. पी. के. पाटील आणि पर्यवेक्षक डॉ. एस. जी. जगताप आदी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक, तसेच पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे नियोजन समितीप्रमुख सुशील चव्हाण यांनी केले. न्यू कॉलेज मेरिट स्कॉलरशिप पात्र विद्यार्थ्यांचे वाचन डॉ. एम. आर. राजमाने यांनी केले. आभार उपप्राचार्य एस. एन. इनामदार यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. एम. ए. नायकवडी यांनी केले.